# विनम्रतेचं उदाहरण - पवित्र मरिया

- फा. सिझर जे. डाबरे

''तुझी प्रतिष्ठा वाढत जाईल तसतसा तू अधिक विनयाने वाग, म्हणजे तुला परमेश्वराची कृपा मिळेल.'' (बेनसिरा ३:१८)

पानापालवीत डवरलेला आणि फुलाफळांनी बहरलेला वृक्ष नेहमी झुकलेला असतो. म्हणूनच म्हणतात ना, ''विद्या विनयेन शोभते.'' मरियेचे मोठेपण तिच्या नम्रतेत दडलेलं आहे. देवाची माता होण्याचा मान मिळालेला असताना देवाने तिच्यावर जी कृपा केली त्याबद्दल ती गर्वाने फुलून न जाता नम्र अंत:करणाने 'स्तोत्र' गाऊन देवाचे आभार मानते :''माझा जीव प्रभुला थोर मानितो आणि देव जो माझा तारणारा त्याच्यामुळे माझा आत्मा उल्हासला आहे. कारण त्याने ह्या गरीब दासीला मोठा आशीर्वाद दिला आहे.''

जणू नम्रता हा गुण प. मरियेच्या रक्तात भिनलेला होता. देवदूताचे अभिवादन ऐकताच मरिया म्हणाली, ''मी प्रभूची दासी आहे आपण सांगितल्याप्रमाणे मला होवो.'' मरिया स्वत:ला रिक्त करते. ती परमेश्वराला शरण जाते. मरिया खरी विनम्रता धारण करते. फिलीपैकरांस लिहिलेल्या पत्रात (२:३) मध्ये म्हटल्याप्रमाणे प. मरिया देवासमोर लीन होऊन देवाला श्रेष्ठ मानते. ती सेवकाचे मन धारण करते. विनम्रता म्हणजे न्यूनपणा किंवा कमीपणा नव्हे तर सेवकपणा. शरण जाण्यात व्यक्तीचे अपयश समजले जाते पण देवाला शरण जाण्यात कमीपणा नाही. कारण बेनसिरा (१:१४-२०) पुस्तकात म्हटल्याप्रमाणे, ज्ञानाचे मूळ परमेश्वराच्या भीतीमध्ये आहे. परमेश्वराच्या भीतीत ज्ञानाचे शिरोभूषण आहे, परमेश्वराच्या भीतीत पूर्णत्व आहे, परमेश्वराची भीती बाळगणे हा ज्ञानाचा आरंभ आहे. केवळ ज्ञानसंपन्न असून चालत नाही तर कर्तव्यनिष्ठ असणे फार महत्त्वाचे आहे. प. मरियेच्या प्रत्येक कृतीत आपल्याला विनम्रता दिसून येते. प. मरियेने सर्व सामाजिक व धार्मिक नियमाचे काटेकोरपणे पालन केले. ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे तिने स्वत:चे शुद्धीकरण केले. मुलगा जन्मल्यावर, चाळीस दिवसापर्यंत मातेला कोणत्याही धार्मिक विधीत सहभागी होता येत नसे. तिला अशुद्ध मानत. चाळीस दिवसांनंतर एक कबुतर व एक कोकरू अर्पण करून तिचे शुद्धीकरण करण्यात येई. मरियेला शुद्धीकरणाची गरज नव्हती. कारण ती सर्वांगाने शुद्ध होती. तरीही ती स्वत:चे 'शुद्धीकरण करते.'

प्रभू येशू म्हणतात, जे विनम्र ते धन्य, स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. परमेश्वर सर्वात लहान असलेल्या माणसांना सर्वात मोठे बनवतो. मरियेसारख्या दासीला त्याने साऱ्या पृथ्वीची आई बनवली आहे. शमुवेलच्या पहिल्या पुस्तकाच्या १६व्या अध्यायातील कथेनुसार दावीदसारख्या एका गुराख्याला रानातून बोलावण्यात आले आणि तिथेच सर्व भावांसमक्ष त्याचा राजा म्हणून अभिषेक करण्यात आला. ''जो शेवटला तो पहिला होईल.'' आणि तेच दावीदच्या ठायी पूर्ण झाले. नेहमी लहान मनुष्य नम्रपणे प्रभूचा स्वीकार करतो,

अथवा आपण लहान आहोत ह्या जाणिवेने तो मोठ्यांच्या आज्ञेत राहतो. आपण मोठमोठ्या पदव्या मिळवल्या, मोठमोठी पदं संपादन केली यावरून हे कधीच सिद्ध होत नाही की आपली नीतिमत्ता उत्तम आहे. आपण ज्ञानी आहोत; तर त्यासाठी त्या पदाला अनुसरून आपले वर्तन असायला हवे. आपल्याजवळ काही मूलभूत मूल्येही हवीच. ह्याविषयी म्हणतांना रामकृष्ण परमहंस म्हणतात, ''घारी किंवा गिधाडे निरभ्र आकाशात उंच उंच जातात, पण त्यांचे लक्ष असते ते सडलेल्या किंवा कुजलेल्या गोष्टींकडे.'' काही विद्वानांची दृष्टी ही अशी असते. बोलतानाच फक्त ते उंचावर जातात. विनम्रतेचे उदाहरण देताना बहिणाबाई चौधरी म्हणतात, ''फाट आता टराटरा, नाही दया तुफानाला. हाले बाभळीचे पान बोले केळीच्या पानाला.'' ह्याचा मतितार्थ असा की बाभळीचे पान तसे अगदी लहान. तरीदेखील जेव्हा सोसाट्याचा वारा येतो तेव्हा हे बाभळीचे किंवा चिंचेचे चिमुकले पान वाऱ्याला कौतुकाने कुरवाळते. ह्याउलट केळीचे पान जे तुलनेने महान ते मात्र ह्या वाऱ्याला अडवू पाहते व आपला ऊर फाडून घेते. संत तुकाराम एका अभंगात म्हणतात, ''लहानपणा देगा देवा! मुंगी साखरेचा रवा!'' हे लहानपण म्हणजे व्यक्तीचे अवमुल्यन नव्हे; हे आहे सभ्यतेचे सार. सभ्य माणसाचे आचार, विचार, उच्चार नेटके असतात. तिचा मिरवण्याकडे कल नसतो. सभ्य व्यक्ती प्रसिद्धीमागे नसते. म्हणूनच प्रभू येशू ख्रिस्ताने संत लूकच्या शुभवर्तमानात अध्याय ६:३९-४२मध्ये सांगितल्याप्रमाणे आत्मनिरीक्षण, आत्मपरीक्षण व अभ्यास या मार्गाने स्वत: जाणे व विद्यार्थ्यांना त्याच वाटेने घेऊन जाणे ह्यातच खरी विनम्रता आहे.

सर्वसमर्थ देवाच्या ह्या आशीर्वादामुळेच कुमारी मरियेला अनन्यसाधारण अशी कृपादाने प्राप्त झाली. जन्माच्या पहिल्या क्षणापासून ती निष्कलंक राहिली. तारणाऱ्याच्या जीवनात अखेरपर्यंत विश्वासू राहिली. ह्याच आशीर्वादाचा मुकुटमणी म्हणून पापमृत्यूवर प्रभुख्रिस्ताने मिळविलेल्या अंतिम विजयात ही देवमाता सहभागी झाली. म्हणूनच तिचा पुत्र ख्रिस्त ह्याच्याप्रमाणे ती शरीर व आत्म्यासह स्वर्गीय वैभवात घेतली गेली. राणीपद मिळवून आपल्या पुत्राच्या युगानुयुगाच्या मृत्युंजयी राजाच्या उजव्या हाताला बसण्याचा सन्मान तिला प्राप्त झाला.

प्रभूची दासी बनलेली मरिया स्वर्ग आणि पृथ्वीची राणी झाली. सर्व पिढ्या गेली दोन हजार वर्षे तिला धन्य म्हणतात. गौरवाच्या शिखरावर नम्रतेचा झेंडा फडकावणारी जी अगदी थोडी माणसे असतात त्यांच्यात मरिया प्रथम स्थानावर आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अगदी **No One** बनलेली मरिया आज **No 1** (नंबर वन) बनलेली आहे ती तिच्या नम्रतेमुळेच, नाही का?